# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

५ वा मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जाक्र.मजीप्रा–1098/सभा–84/आ–4.

दिनांक : 22 जून 1999.

विषय : दिनांक 15/6/99 रोजी झालेल्या, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 84 व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक 15 जून 1999 रोजी झालेल्या 84 व्या बैठकीच्या कार्यक्रम बाबींवर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत आले. या बैठकीच्या कार्यक्रम बाबींचे इतिवृत्त, खालीलप्रमाणे तयार करण्यांत आले आहे, त्यास मंजुरी मिळावी, ही विनंती.

(एन.रामाराव)
सदस्य सचिव (प्रशासन)

मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.

Received 9/7/99

sabha.a13

# दि.१५ जून, १९९९ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८४ व्या बैठकीचे अतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८४ वी बैठक मा.मंत्री,समाज कल्याण ,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा.श्री.अण्णासाहेब डांगे, यांचे अध्यक्षतेखाली दि.१५ जून,१९९९ रोजी संपन्न झाली. या बैठकीस खालील सदस्य व विशेष निमंत्रित उपस्थित होते.

१) मा.मंत्री,समाज कल्याण,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष
२) मा.मंत्री,ग्राम विकास तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द सहअध्यक्ष
३) मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
४) श्री.व्ही.पी.राजा, प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
५) श्री.आशिष कुलकर्णी,सदस्य
६) श्री.विद्याधर कानडे, सचिव,वित्त(व्यय) विभाग,सदस्य,म.जी.प्रा
७) श्री.रमेशकुमार,सचिव, ग्राम विकास विभाग, सदस्य,म.जी.प्रा
८) श्री.एन.रामाराव,सदस्य सचिव(प्रशासन),म.जी.प्रा.
९) श्री.राजेंद्र सगणे,सदस्य सचिव(तांत्रिक),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी ''विशेष निमंत्रित'' म्हणून उपस्थित होते,

१) श्री.शे.दौ.अरमाळ,मुख्य अभियंता व विशेष कार्य अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
२) श्री.एस.के.पाटील,मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,नाशिक
३) श्री.अ.ना.अळवणी,मुख्य अभियंता,कोकण प्रदेश,ठाणे.
४) श्री.एन.व्ही.दोमकोंडवार,मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,अमरावती
५) श्री.दिपक भसाळे,मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,नागपूर
६) श्री.स.रा.बागल, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
७) श्री.नि.कृ.माडा,मुख्य प्रशासकीय अधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
८) श्री.मिलिंद केळकर,अधीक्षक अभियंता(समन्वय),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
९) श्री.बी.टी.कांबळे,अधीक्षक अभियंता,गुण नियंत्रण कक्ष,म.जी.प्रा.,नवी मुंबई
१०) श्री.पी.के.सोनाग्रा,अधीक्षक अभियंता(मुख्यालय),म.जी.प्रा.,नवी मुंबई
११) श्री.बी.एस.पाटील,उप मुख्य लेखा अधिकारी(१),म.जी.प्रा.,नवी मुंबई

मा.मंत्री,समाजकल्याण,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी प्रस्तावित कार्यक्रम बाबींवर चर्चा करण्याचे निर्देशित केल्यानंतर सभेस सुरुवात झाली.

या सभेमधील चर्चेस सुरुवात करताना सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी प्रथम स्पष्ट केले की, प्रामुख्याने या सभेचा उद्देश म्हणजे नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या सदस्यांचे स्वागत व परिचय हा आहे. त्यानुसार त्यांनी या बैठकीस प्रथमच उपस्थित असणारे मा.मंत्री,गामविकास तथा प्राधिकरणाचे पदसिध्द सहअध्यक्ष यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. त्यानंतर सर्व उपस्थित नवनियुक्त सदस्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

यानंतर मा.अध्यक्ष महोदयांनी नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या अशासकीय ;तांत्रिक व इतर सदस्यांबाबत थोडक्यात माहिती दिली. यानंतर प्रस्तावित करण्यात आलेल्या कार्यक्रम बाबींवरील चर्चेस सुरुवात झाली.

....२.....

## कार्यक्रम बाब क्र.१:–महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८३ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

८२ व्या सभेमध्ये जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी देण्यास सुरुवात केली.

अ) रत्नागिरी येथे अधीक्षक अभियंता, यांच्या कार्यालयासाठी इमारत व निवासस्थान बांधणे.

या कामची निविदा स्वीकृत होवून कार्यादेशही देण्यात आले आहेत. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वैशिष्टयपूर्ण इमारतीबाबत वास्तुविशारद तज्ञांकडून नकाशा प्राप्त करुन घेवून इमारतीचा आराखडा कसा असावा याबाबत काय निर्णय घेण्यात आला याची विचारणा मा.मंत्री महोदयांनी केली. त्यावर मुख्य अभियंता,ठाणे,यांनी वास्तुविशारद तज्ञाकडून प्राप्त झालेला नकाशा सर्वांच्या निदर्शनास आणून दिला. तथापि, अशा पध्दतीच्या इमारती बांधावयाच्या किंवा कसे याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या नकाशाच्या अनुषंगाने इमारतीची स्पष्ट कल्पना येत नसल्याने थ्री डायमेंशनल व्हयूव्दारे इमारत कशी असेल याची कल्पना येवू शकेल असे मुख्य अभियंता,ठाणे,यांनी स्पष्ट करुन पुढील बैठकीच्या वेळी या इमारतीचा थ्री डायमेंशनल व्हयू सादर करण्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी रत्नागिरी येथे इमारत बांधावयाच्या निविदेसंबंधी विचारणा केली. त्यावर सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले की, या कामाच्या निविदा स्वीकृत करण्याबाबत पूर्वीच निर्णय झाला असून फक्त प्राधिकरणाच्या इमारती कशा असाव्यात याबाबत निर्णय घेणे असे या चर्चेचे प्रयोजन आहे. त्यावर अध्यक्ष महोदयांनी पुढील बैठकीमध्ये याबाबतचा आराखडा सादर झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल असे स्पष्ट केले.

ब) प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयांना झेरॉक्स मशिन पुरविणे

दर करारावर उपलब्ध असणारे मशिन व केंद्रीय भांडार दरसूचीवर उपलब्ध असणारे मशिन्स याबाबत तुलनात्मक आढावा घेवून कोणते मशिन्स घ्यावयाचे याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. तथापि, याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही. काही पुरवठादारांनी त्यांचे दर कमी केले असून मशिनची गुणवत्ता व उपयुक्तता याबाबत अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल असे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले. याबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सविस्तर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

क) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थिक स्थिती

या विषयावर चर्चा करताना सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले की, अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार कोणत्या मंडळाने किती निधी वापरावयाचा होता व प्रत्यक्षात किती निधी वापरला गेला याबाबतची माहिती प्राप्त झाली आहे तथापि, या बैठकीचे आयोजन ऐनवेळेवर झाल्यामुळे प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करुन ती माहिती सादर करता आली नाही. मात्र पुढील बैठकीच्या वेळी याबाबत सविस्तर माहिती सादर करण्यात येईल ही बाब सर्वांनुमते मान्य करण्यात आली.

८३ व्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत कोणाकडून आक्षेप घेतला गेला नसल्याने या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

## कार्यक्रम बाब क्र.२:–महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२६/३/९९ रोजी झालेल्या ८३ व्या सभेतील बाबींवर करण्यात आलेली कृती.

८३ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्या अनुषंगाने जी कार्यवाही करणे अपेक्षित होते तशी कार्यवाही करण्यात आली असून त्याची माहिती या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आल्याचे सदस्य

सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले. या अनुषंगाने चर्चा करण्यात आली व म.जी.प्राधिकरणाच्या आर्थिक स्थितीची माहिती प्रत्येक बैठकीमध्ये ठेवण्यात यावी असे ठरविण्यात आले होते. तशी कार्यक्रम बाब ठेवण्यात आली आहे काय याची विचारणा करण्यात आली असता अशी कार्यक्रम बाब पुढील बैठकीमध्ये ठेवण्यात येईल असे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले. चर्चेअंती कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

## कार्यक्रम बाब क्र.३:-कार्यकारी अभियंता,म.जी.प्रा.बांधकाम विभाग क्र.२,अमरावती,यांच्या कार्यालयासाठी इमारत बांधणे

कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाच्या भाडयापोटी होणारा दरमहा रु.१५०००/- खर्च वाचविणे व प्रशासकीय दृष्टया सर्व कार्यालये एकत्र असणे या उद्देशाने ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आली असून या इमारतीसाठी १९० चौ.मीटरचे बांधकाम करावयाचे आहे. त्यासाठी अंदाजे रु.१४.७२२ लक्ष खर्च येणार आहे हे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले. त्यानंतर या अंदाजपत्रकास मान्यता देण्यासंबंधी चर्चा झाली असता या इमारतीचा स्थळ दर्शक नकाशा, लाईन अंदाजपत्रकासंबंधी विचारणा करण्यात आली. तथापि, ही कागदपत्रे कार्यक्रम बाबी सोबत जोडली नसल्याने यावर सविस्तर चर्चा होवू शकली नाही. त्यामुळे ही कार्यक्रम बाब सर्व आवश्यक कागदपत्रांसह पुढील बैठकीमध्ये सादर करावी अशा सूचना मा.अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

## कार्यक्रम बाब क्र.४:-महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने गेल्या चार वर्षात केलेल्या कार्यासंबंधी जाहिरात स्वरुपातील माहिती वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्याबाबत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

या कार्यक्रम बाबीचे स्वरुप सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट करुन जाहिरात स्वरुपातील माहिती वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यासाठी झालेल्या रु.६,६१,५३९/- व रु.५,००,०००/-खर्चास कार्योत्तर मान्यता देण्याची विनंती सदस्य सचिव(प्रशासन) यांनी केली.

१ मे,९९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या पुरवणीचा एकूण खर्च रु.७० लक्ष असून यापैकी रु.१८ लक्ष माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत केला जाणार असून उर्वरित रक्कम काही प्रमुख महामंडळाच्या मदतीने उभारावयाची होती त्यामध्ये प्राधिकरणाचा समावेश होता. यासाठी प्राधिकरणाने रु.५ लक्ष निधीचे योगदान केले आहे ही बाब मा.अध्यक्षांनी सर्वांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर या खर्चास सदस्यांनी मान्यता दिली.

तथापि, रु.६,६१,५३९/- इतका निधी इंग्रजी पुरवणीचे देयक मागविण्यासाठी करण्यात आला असला तरी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीमध्ये सादर करावा व त्यानंतरच याबाबत निर्णय घेण्यात येईल असे मा.अध्यक्ष महोदयांनी स्पष्ट केले. त्यानुसार रु.६,६१,५३९/- इतक्या खर्चास मान्यता घेण्यासाठी पुढील बैठकीमध्ये सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

यानंतर सर्वसाधारण चर्चा करताना मा.अध्यक्ष महोदयांनी अशासकीय सदस्यांना सुविधा पुरविण्याबाबत काय झाले याची विचारणा केली. यावर सदस्य सचिव(तांत्रिक),यांनी स्पष्ट केले की, असा प्रस्ताव शासनास सादर केला होता मात्र त्यास मान्यता मिळालेली नाही. याबाबत झालेल्या पत्रव्यवहाराची नस्ती सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर मंत्री मंडळाच्या बैठकीमध्ये ही बाब प्रस्तावित करण्यात यावी असे अध्यक्ष महोदयांनी स्पष्ट केले. यावर सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी असे सांगितले की, . प्रकरणाचा पूर्ण अभ्यास करुन,मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचेबरोबर चर्चा करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त चर्चेनंतर या सभेचे कामकाज संपल्याचे मा.अध्यक्ष महोदयांनी जाहीर केले व सभा संपली.